# जाहीर नोटीस (१)

सर्व संबंधितांना या नोटीसीव्दारे कळविण्यात येते की , खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेले पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील व पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे मंजूर विकास योजनेतील रस्त्याने बाधित क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधिताकडून खाजगी वाटाघाटीने ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्वेध व निजोखीम असल्याचा भरवसा सदर मिळकतीच्या हितसंबधितानी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस दिला आहे.

उपरोक्त मिळकतीवर वरील जमीन मालकांशिवाय अन्य कोणताही अन्न, वस्त्र, गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी, लीज, लीन, चार्ज, इजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास संबंधितांने प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत उपसंचालक नगररचना, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-४११०१८ यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत येऊन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास वरील मिळकतीवर कोणाचाही कसलाही हक्क वा हितसंबंध नाही असे समजून किंवा असल्यास संबंधितांने तो जाणूनबुजून सोडून दिला आहे असे समजून पिंपरी चिंचवड महानगरपालिका तर्फे सदर जमीनीचा मोबदला खाजगी वाटाघाटीने मोबदल्याच्या स्वरूपात वरील जमीन मालकास अदा केला जाईल व जमीन महापालिका ताब्यात घेईल. त्यानंतर येणा-या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

परिशिष्ट –१

मिळकतीचे वर्णन – तुकडी पुणे, पोट तुकडी हवेली, येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे रहाटणी येथील स.नं. ९९।१४।८ पैकी, सि.स.नं. ६१९५, श्रीम. कु. जैन वर्की यांच्या मालकीच्या मिळकतीतील पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या मंजूर विकास योजनेतील तथापि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजन नियंत्रण कक्षेमध्ये समाविष्ट करणेत आलेल्या क्षेत्रातील ४५.०० मी. रूंद रस्त्याचे बाधित अंदाजे क्षेत्र ९०.१४ चौ.मी. जमीन त्यास चतु:सिमा खालीलप्रमाणे

चतु:सिमा:-

पूर्वेस -सि.स.नं .६१९५ पैकी.

पश्चिमेस – सि.स.नं .६१९८ पैकी.

दक्षिणेस -सि.स.नं .६१९४ पैकी.

उत्तेरस -सि.स.नं .६१९६ पैकी.

परिशिष्ट –२

मिळकतीचे वर्णन – तुकडी पुणे, पोट तुकडी हवेली, येथील तसेच पिंपरी चिंचवड महानहरपालिका हद्दीतील मौजे बो-हाडेवाडी येथील गट नं ३६४ पै ( मोशी जुना गट नं ७४१पै), मधील, श्री संदीप रसिकलाल शाह यांच्या मालकीच्या मिळकतीतील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील ६०.०० मी रूंद रस्त्याने बाधित क्षेत्र ७०.०० चौ मी क्षेत्र जमीन त्यास चतु:सिमा खालीलप्रमाणे

चतु:सिमा – ६०. ०० मी रस्ताबाधीत क्षेत्र ७०.०० चौ मी

उत्तरेस – ला.गट नं ३६३

पूर्वेस - रस्ता

दक्षिणेस – ला.गट नं ३६५

पश्चिम - ला.गट नं ३६१

## जाहीर नोटीस (२)

संबंधितांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेले सर्व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर योजनेतील आरक्षणाने/रस्त्याने बाधीत क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांकडून हस्तांतरणीय विकास हक्काच्या ( टि.डी. आर) बदल्यात ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्बेध व निजोखीम असल्याचा भरवसा सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस दिला आहे.

खालील नमूद मिळकतीवर खालीलप्रमाणे जमीन मालकांशिवाय अन्य कोणाचाही अन्न, वस्त्र, गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी,लीज लीन, चार्ज, इजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास संबंधितांने प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाच्या आत उपसंचालक, नगररचना, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी पुणे ४११०१८ यांच्या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व वेळेत येऊन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास वरील मिळकतीवर कोणाचाही, कसलाही हक्क वा हितसंबंध नाही असे समजून किंवा असल्यास संबंधीताने तो जाणूनबुजून सोडून दिला आहे. असे समजून पिंपरी चिंचवड महानगरपालिका जमिन ताब्यात घेईल व सदर जमिनीचा मोबदला टि डी आर च्या स्वरूपात खालील जमीनमालकास अदा केला जाईल. त्यानंतर येणा-या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

परिशिष्ट १- मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे , पोट तुकडी हवेली , येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील **मौजे वडमुखवाडी** येथील **स.नं.२१८/२/१०** मधील **श्रीम.कुजनकुटी दास** यांच्या मिळकतीमधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्र मंजूर विकास योजनेतील ६०.००मी रस्त्याने बाधीत अंदाजे क्षेत्र **४१०.३७ चौ.मी.**जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे,

चतु:सिमा : -

उत्तरेस :- **ला.स.नं.२१८ पै.**

पुर्वेस :- **ला.स.नं.२१८ पै.**

दक्षिणेस :- **ला.रस्ता.**

पश्चिमेस :- **ला.स.नं.२१८ पै.**

परिशिष्ट – २ मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे, पोट तुकडी हवेली, येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील **मौजे रावेत** येथील **७६/४/३ पै** मधील **सौ.डॉ. निशा धनराज कोदनानी व श्री. धनराज नारायणदास कोदनानी** यांचे मिळकतीमधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्र मंजूर विकास योजनेतील १८.०० मी रस्ता व आ.क्र. ४/९८ दवाखाना व प्रसुतिगृह या प्रस्तावाने बाधित होणारे एकुण क्षेत्र **७२६.०० चौ.मी.** मधील जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे

चतु:सिमा : -

मौजे रावेत येथील स नं ७६/४/३ पै

१८.०० मी रस्ता व आ.क्र. ४/९८ दवाखाना व प्रसुतिगृह चतु:सिमा : ( एकुण बाधित क्षेत्र ७२६.०० चौ.मी )

उत्तरेस :- स. नं. ७६ पै मिळकत

पुर्वेस :- स. नं. ९६ ची मिळकत

दक्षिणेस :- स. नं. ९५ ची मिळकत

पश्चिमेस :- स. नं. ७६ पै मिळकत

उपसंचालक,
नगररचना व विकास विभाग,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी पुणे ४११०१८

सदरची जाहीर नोटीस पिंपरी चिचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

जाहिरात क्रमांक ५५
दिनांक 9२/6/2016